19

(महाराष्ट्र शासन)

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद-४३१ ००१ (म.रा.)

# Govt. Medical College, Aurangabad - 431 001 (M.S.)

दूरध्वनी - (०२४०) २४० २०२८ फॅक्स - (०२४०) २४०२४१८
पीबीएक्स - (०२४०) २४०२४१२-१७ फॅक्स - (०२४०) २४०२४१९

जा.क्र.शावैमऔ/एमएलसीऑटोप्सी/पीजी/ 629 /२०१३ दिनांक: 05/०१/२०१३.

09 JAN 2013

प्रति,
अधिष्ठाता,
महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय,
एन-६, सिडको,
औरंगाबाद.

M...'S M... College
Inward No. 4849
Date 14-1-13

विषय:- महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद मधील पदव्यूत्तर, एम.डी., न्यायवैद्यकशास्त्र विद्यार्थ्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे शवविच्छेदना(ऑटोप्सी) साठी परवानगी मिळणेबाबत.....

संदर्भ:- आपले पत्र जा.क्र.एमजीएम/एमसीएच/२०१२/३८१२, दिनांक १७.१०.२०१२

महोदय,

आपल्या संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील पदव्यूत्तर (एम.डी.) विद्यार्थ्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे शवविच्छेदना(ऑटोप्सी)साठी खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१) विद्यार्थ्यांनी साध्या प्रकरणातील शवविच्छेदने पहावीत. मात्र त्यांना स्वतंत्ररित्या शवविच्छेदन करता येणार नाही.
२) या महाविद्यालयाच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागाच्या पदव्यूत्तर विद्यार्थ्यांसोबत एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्यूत्तर विद्यार्थ्यांना साध्या (गुंतागुंत नसल्यास) प्रकरणात शवविच्छेदन करता येतील. त्यांना अहवालावर सही करावी लागेल व नियमानूसार गरज पडल्यास सरकारतर्फे साक्ष देण्यासाठी न्यायालयात उपस्थित रहावे लागेल.
३) या महाविद्यालयाच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागाच्या डिस्पोजेबल मटेरियलच्या खर्चासाठी कमीत कमी रु.१००/- (रु.शंभर फक्त) प्रती शवविच्छेदन प्रती विद्यार्थी इतकी रक्कम अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडे जमा करावी लागेल.
४) शवविच्छेदनगृहाचे कामकाज, तेथील स्वच्छता तसेच वातावरण यावर खराब परिणाम होणार नाही याची खबरदारी विद्यार्थ्यांना घ्यावी लागेल. तसेच कामकाजाची गोपनीयता व विश्वासार्हता पाळावी लागेल.

Dr. Sami sir
14/1
14/1

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद.

MGM's Medical College * Aurangabad *